**<u>ठळक बातम्या</u>**

- ईशान्येकडची राज्ये ही भारताची समृद्धी आणि संपत्तीच्या विविध पैलूंचं प्रतिक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- भारताच्या मुक्त व्यापार करारांचा फायदा घेऊन विकसित देशांमधली निर्यात अधिकाधिक वाढवण्याचं केंद्रीय उद्योग मंत्री पीयूष गोयल यांचं आवाहन

- अमली पदार्थांचा तस्कर मोहम्मद सलीम डोला याला तुर्कस्तानातून भारतात आणण्यात यश

**आणि**

- शांतता कायम राखण्यासाठी कार्यरत राहण्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांचं शांघाय सहकार्य संघटनेला आवाहन

**<><><><><>**

ईशान्येकडची राज्ये ही भारताच्या अष्टलक्ष्मी असून ही राज्ये समृद्धी आणि संपत्तीच्या विविध पैलूंचं प्रतीक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सिक्कीम राज्याच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्तानं आज गंगटोकमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पर्यटन हा सिक्कीमच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. त्यामुळे इथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी राज्यातील संपर्कव्यवस्था सुधारण्यावर केंद्र सरकारचा भर असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. तसंच राज्यात पायभूत सुविधा वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचंही त्यांनी सांगितलं.

- **- होल्ड - प्रधानमंत्री - -**

याच कार्यक्रमात सहा क्रिकेट प्रशिक्षण संस्थांचं तसंच ४ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते करण्यात आली.

**<><><><><>**

भारताच्या मुक्त व्यापार करारांचा फायदा घेऊन विकसित देशांमधली निर्यात अधिकाधिक वाढवावी असं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी

केलं आहे. निर्यात प्रोत्साहन परिषद आणि उद्योजक संघटनेच्या सदस्यांच्या बैठकीत नवी दिल्लीत ते बोलत होते. गेल्या आर्थिक वर्षात देशाची निर्यात विक्रमी ८६० अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. जागतिक पातळीवर संकटं असली तरी अभियांत्रिकी, औषधी, रसायन, दागदागिने आणि कृषी आधारित उत्पादनांची निर्यात मोठ्या प्रमाणात झाल्याचं ते म्हणाले. २०३० पर्यंत २ अब्ज डॉलरच्या निर्यातीचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हा वेग कायम ठेवण्याचं आवाहन त्यांनी केलं.

भारत आणि न्यूझीलंडमध्ये झालेल्या मुक्त व्यापार कराराचं औषधी निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष नमित जोशी यांनी स्वागत केलं आहे. यामुळं या क्षेत्रातला व्यापार १ अब्ज डॉलरपर्यंत जाईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठीचं दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातलं मतदान उद्या होणार आहे. राज्यातल्या सात जिल्ह्यांमधल्या १४२ मतदारसंघात उद्या सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात होईल. मतदान प्रक्रियेसाठीची तयारी पूर्ण झाली असून निवडणूक अधिकारी संबंधित मतदान केंद्राकडे रवाना झाले आहेत.

या टप्प्यात ३ कोटी २० लाख मतदान मतदानाचा हक्क बजावणार असून यात दीड कोटी महिला आणि ७९२ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. शेवटच्या टप्प्यात १ हजार ४४८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून यात २२० महिलांचा समावेश आहे. हुगळी जिल्ह्यातल्या चिनसुराह मतदारसंघात सर्वाधिक मतदार असून उत्तर २४ परगणा जिल्ह्यातल्या भाटपारा मतदारसंघात सर्वात कमी मतदारसंख्या आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे २ हजार ३२१ जवान बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आलेत. तसंच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अतिरिक्त आयपीएस आणि डब्ल्यूबीपीएस अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार निवडणूक आयोगाने दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानाच्या आधी मतदार यादीत १ हजार ४६८ नवी नावं जोडली असून, सहा नावं वगळली आहेत.

पश्चिम बंगालमधे २३ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यातलं मतदान झालं. यात ९३ टक्क्याहून अधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. या टप्प्यात यापेक्षा जास्त मतदान होईल अशी निवडणूक आयोगाला अपेक्षा आहे.

**<><><><><>**

मुर्शिदाबादमधल्या ऐतिहासिक 'खुशबाग' या दफनभूमीसह, इतर अनेक मशिदी आणि दफनभूमीतल्या कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या अत्यल्प वेतनाबद्दल कोलकाता उच्च न्यायालयानं आश्चर्य व्यक्त केलं आहे. या ठिकाणी २६ वेगवेगळ्या पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना २२ रुपये, ९ रुपये, ७ रुपये आणि ५ रुपये, इतकं अल्प मासिक वेतन मिळत असल्याचं नोंदींवरून आढळत असून, ही गोष्ट धक्कादायक असल्याचं न्यायालयानं म्हटलं आहे. ब्रिटिश काळापासून 'राजकीय निवृत्तीवेतन' या श्रेणी अंतर्गत हे वेतन दिलं जातं. त्यामुळे सध्याच्या तरतुदींनुसार त्यामध्ये वाढ करता येणार नाही, असं केंद्र सरकारनं म्हटलं आहे, या प्रकरणी आपण हस्तक्षेप करू शकत नाही, अशी राज्य सरकारची भूमिका आहे. या प्रकरणी न्यायालयानं केंद्रसरकारला नोटीस बजावण्याचे आदेश दिले असून, येत्या ४ मे रोजी खटल्याची पुढली सुनावणी होणार आहे.

**<><><><><>**

विशाखापट्टणम इथे गुगल क्लाउड इंडिया एआय हबची पायाभरणी आज केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते झाली. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनं, सेमीकंडक्टर निर्मिती, प्रगत चिप डिझाईन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान क्षेत्रात भारत वेगाने वाटचाल करत असल्याचं अश्विनी वैष्णव याप्रसंगी म्हणाले. मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्रात भारत एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उदयाला येत आहे. गेल्या काही वर्षात धोरणात्मक पाठिंबा आणि खंबीर राजकीय नेतृत्वामुळे हा बदल झाल्याचंही वैष्णव यांनी नमूद केलं. विशाखापट्टणम हे शहर देशाचं एक उदयोन्मुख कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र बनणार असून लवकरच एआय पट्टणम म्हणून ओळखलं जाईल, असंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

अमली पदार्थांचा तस्कर मोहम्मद सलीम डोला याला आज पहाटे तुर्कस्तानातून भारतात परत आणलं असून, अमली पदार्थ नियंत्रण संस्थेचं हे मोठं यश असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. सलीम डोला हा कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याचा

हस्तक असून, गुप्तचर यंत्रणांनी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्यानं त्याच्या प्रत्यार्पणाची कारवाई अमलात आणली.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय मानकांचं योग्य पालन केलं तर परिसरात शांतता राहू शकते. या मानकांचं रक्षण करण्यासाठी शांघाय सहकार्य संघटनेनं कायम कार्यरत रहावं असं आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी केलं आहे. किर्गिझस्तान मधल्या बिश्केक इथं ते संघटनेच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत बोलत होते.

**- - होल्ड - बाइट - - -**

संघटनेची ध्येय धोरण राबवण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचंही ते म्हणाले. या दौऱ्यात त्यांनी आज चीनचे संरक्षण मंत्री डोंग जून तसंच रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रेई बेलौसोव्ह यांचीही भेट घेतली.

शांघाय सहकार्य संघटनेच्या सदस्य देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या परिषदेला उपस्थित राहण्यासाठी ते काल किर्गिझस्तानची राजधानी बिश्केक इथं पोहोचले आहेत.

<><><><><>

उष्णतेच्या लाटेपासून असुरक्षित जनतेचं संरक्षण करण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना लागू करण्याबाबत, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं महाराष्ट्रासह देशातली २१ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र जारी केलं आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं राज्यांमध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी आणि जीवितहानी टाळण्यासाठी त्यांनी केलेल्या कारवाईचा अहवाल आयोगानं मागितला आहे.

देशात २०१९ ते २०२३ या काळात उष्माघातामुळे ३ हजार ७१२ पेक्षा जास्त जीवितहानी झाल्याच्या आकडेवारीची नोंद घेत, आयोगानं एकात्मिक आणि सर्वसमावेशक उपाययोजनांचे निर्देश दिले आहेत.

<><><><><>

इंडोनेशिया मधे बेकासी इथं झालेल्या रेल्वे अपघातातल्या मृतांची संख्या १४ वर पोहोचली आहे. मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरू आहे, अशी माहिती पीटी केरेटा एपी

इंडोनेशिया या रेल्वे कंपनीने दिली आहे. बेकासी रेल्वे स्थानकाजवळ एका रेल्वे गाडीनं थांबलेल्या गाडीला धडक दिल्यामुळे हा अपघात झाला.

**<><><><><>**

इस्लामिक स्टेट या दहशतवादी गटाने नायजेरियामधल्या एका गावात केलेल्या हल्ल्यात २९ जणांचा मृत्यू झाला आहे. नायजेरियामधल्या आदामावा राज्यातल्या गुयाकू या गावात काल रात्री उशीरा हा हल्ला झाल्याचं स्थानिक प्रशासनानं सांगितलं. इस्लामिक स्टेट या गटानं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. आदामावा राज्याचे गव्हर्नर अहमदू उमरू फिंतीरी यांनी गुयाकू गावाला भेट दिली असून हा हल्ला दुःखद असल्याचं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**